# पत्रव्यवहार.

| लेखांक पा० ता० | खरी तारीख. | टीका. |
|---|---|---|
| १ | आक्टोबर १७३२ | लेखांक २१८ पहा. हें पत्र १७२४।२५ सालचें नाहीं. |
| २ | ८ एप्रिल १७३० | |
| ३ | २३ डिसेंबर १७३५ | |
| ४ | १७ नोव्हेंबर १७३३ | |
| ५ | १६ जून १७४५ | |
| ६ | १७४३ | लेखांक २९० पहा. |
| ७ | १९ फेब्रुवारी १७२९ | काव्येतिहाससंग्रहांत छापिलेलें. |
| ८ | १७ आगस्ट १७३७ | काव्येतिहाससंग्रहांत छापिलेलें. |
| ९ | जून १७३४ | |
| १२ | जून १७४० | चिमणाजी १७४० त वारला. |
| १७ | १७३२ | |
| १८ | १८ जानेवारी १७३२ | |
| १९ | ७ एप्रिल १७१७ | लेखांक ११४ पहा. 'राजश्री व चिरंजिवांच्या' |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | बद्दल ' राजकीय ' असा पाठ पाहिजे. हें पत्र ३ ऱ्या खंडांत छापिलें आहे. |
| २१ | | २८ जानेवारी १७४० | |
| २२ | | ४ फेब्रुवारी १७४० | |
| २३ | | १७४२ | |
| २४ | | ५ मे १७३९ | ह्यावेळीं बाजीराव वऱ्हाडांत व चिमाजी वसईस होता. |
| २५ | | ४ नोव्हेंबर १७४० | |
| २६ | २ एप्रिल १७३१ | २ एप्रिल १७३१ | रा. पारसनीस लिहितात कीं, त्र्यंबकरावास सेनापति पद १७२१ त मिळालें. परंतु तें खोटें आहे. खंड २ प्रस्तावना पहा. हें पत्र ३ ऱ्या खंडांत छापिलें आहे. |
| २८ | २१ जून १७३४ | २ जुलै १७३३ | माळशिरसाच्या सनदा अर्बा सल्लासीनांत दिल्या. |
| २९ | २७ जून १७३४ | १६ जून १७३५ | पिलाजी जाधवराव हिंदुस्थानच्या स्वारीहून आल्यावर हें पत्र लिहिलें आहे. टांकण घोडा म्हणजे हिमालयांतील किंवा इतर पहाडांतील खुजा घोड्याची जात आहे. |
| ३० | ८ एप्रिल १७३५ | १ जून १७३० | निजाम, कोल्हापूरकर, प्रतिनिधि, फत्तेसिंग, बाबूजी नाईक, वगैरे मंडळी १७३० त बाजीरावाविरुद्ध झाली त्यावेळचें हें पत्र आहे. |
| ३१ | | २८ मार्च १७३६ | दुसऱ्या दिवशीं पत्र साताऱ्यासहि पोहोंचूं शकतें. अंतर ५ मैल. |
| ३२ | | एप्रिल १७३८ नंतर | भोपाळच्या मोहिमेच्या नंतरचें पत्र. लेखांक ११७ पहा. श्रीरंगपट्टणची स्वारी १७२५ |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | नोव्हेंबरापासून १७२६ च्या मेपर्यंत झाली. रा. पारसनीस ही मोहीम १७२७ च्या फेब्रुवारीस झाली म्हणून समजतात तें खोटें आहे. |
| ३८ | | १७४० | बारदेश १७३९ त घेतल्यावरचें पत्र ( Forrest, Siege of Bassein, PP. 55—60 ). |
| ३९ | | फेब्रुवारी १७३९ | |
| ४१ | | | रघोजीनें अमदाबादेकडे स्वारी केली नसून अलाहाबादेकडे स्वारी केली. |
| ४३ | ४ मे १७२९ | २४ एप्रिल १७३० | |
| ४४ | | १४ एप्रिल १७३१ | हें पत्र १७३४ किंवा १७३७ सालचें नसून १७३१ तील आहे. १७३४ त चिमाजी खानदेशांत होता. लेखांक २७ त ' निजामानें गडबड केली तरी तुम्हीं मागें शह देणें ' म्हणून बाजीरावानें चिमाजीस लिहिलें आहे. १७३७ च्या एप्रिलांत चिमाजी कोंकणांत होता. लेखांक ४७ पहा. |
| ४५ | | १९ आगष्ट १७३८ | ह्यावेळीं बाजीराव जेजुरीस होता. |
| ५२ | १३ मे १७३९ | १२ मे १७३९ | लेखांक ५२ व ५३ ह्या दोन्ही पत्रांच्या तारखांबद्दल रा० पारसनीस फारच बुचकळ्यांत पडले आहेत. दोन्ही पत्रें वैशाख वद्य प्रतिपदेला लिहिलीं असून लेखांक ५३ त लेखांक ५२ काल लिहून |

पाठविला असें म्हटल्यामुळें पारसनीस घोटाळयांत पडले इतकेंच नव्हे, तर मित्ती घालण्यांत पेशव्यांची चूक झाली असें त्यांच मत झालें; परंतु पेशवे चुकण्यापेक्षां पारसनीस चुकण्याचा संभव जास्त आहे. खरें पाहिलें तर, ह्या दोन पत्रांच्या तारखांत बरीच माहिती सांठलेली आहे. एक तर, क्षय असो वा वृद्धि असो, पेशव्यांच्या पंचांगांत प्रत्येक तिथीचा आदि व अंत कोणत्या दिवशीं कोणत्या घटकेस व पळास होत असे तें लिहिलें जात असे हें कळतें. व दुसरें असें कीं, चिमाजीनें पोर्तुगीज वसई सोडून गेल्यावर एक दोन घटकांनीं लेखांक ५२ हें पत्र लिहिलें आहे, असें समजतें. लेखांक ५२ व ५३ ह्या पत्रांच्या तारखा १३ मे व १४ मे अनुक्रमें असाव्या असें रा. पारसनीस लिहितात. त्याअर्थी त्यांना ह्या पत्रांतील तारखांचें रहस्य बिलकुल कळलें नाहीं हें उघड आहे. वैशाख वद्य प्रतिपदा शनिवारीं सूर्योदयानंतर एक अवर व २१ मिनिटांनीं लागली व आदितवारीं सूर्योदयापूर्वी एक अवर संपली. अर्थात् शनवारीं सूर्योदयाला पूर्णिमा होती व आदितवारीं

सूर्योदयाला द्वितीया होती. तेव्हां मोडकांच्या जंत्रींत प्रतिपदेचा क्षय दिला आहे तो रास्तच आहे. परंतु प्रतिपदा, शनिवारीं सूर्योदयानंतर १ आ० २१ मिनिटांनीं लागून रविवारीं सूर्योदयापूर्वी १ अवर संपली व त्या अवधींत चिमाजीनें स्वामीला हीं दोन्हीं पत्रें लिहिलीं. पोर्तुगीज लोकांनीं वसई शनवारीं सूर्योदयापूर्वी मध्यरात्रीनंतर कराराप्रमाणें इंग्रजी बाराव्या तारखेस व पोर्तुगीज २३ व्या तारखेस सोडिली. पोर्तुगीजांनीं वसई सोडिल्याबरोबर सूर्योदयाच्या सुमारास मराठे किल्ल्यांत शिरले. किल्ल्यांत शिरल्यावर चिमाजीनें लेखांक ५२ हें पत्र प्रतिपदा लागल्यावर लिहिलें. व "काल वैशाख शुद्ध १५ स फिरंगी झाडून गेला" असें विधान केलें. फिरंग्यांची २३ वी तारीख शनवारीं सूर्योदयापूर्वी मध्यरात्रीस लागली; त्यामुळें ती तारीख लागतांच फिरंगी किल्ला सोडून गेले. तसेंच मराठ्यांची पूर्णिमा शनवारीं सूर्योदयानंतर एक दीड तासांनीं संपल्यावर त्यांनीं किल्ल्यांत प्रवेश वद्य प्रतिपदेला केला. फिरंग्यांनीं पूर्णिमेच्या आंत किल्ला सोडल्यामुळें व चिमा-

जीनें प्रतिपदेच्या प्रारंभीं पत्र लिहिल्यामुळें, व मराठ्यांचा दिवस सूर्योदयाला सुरू होत असल्यामुळें, चिमाजीनें लेखांक ५२ त काल हा शब्द योजिला आहे. लेखांक ५३ हें पत्र चिमाजीनें रविवारीं पहाटेस प्रतिपदा संपण्यापूर्वी लिहिलेलें आहे व त्यांत शनवारीं सूर्योदयीं लिहिलेलें पत्र काल लिहिलें असें म्हटलें आहे. रा० पारसनीस मा शुद्ध दशमी म्हणजे ७ जानेवारी १७३९ समजतात तें चूक आहे. तसेंच अष्टमी म्हणजे चार मे समजतात तेंहि चूक आहे. लेखांक ५२ व ५३ हीं दोन्हीं पत्रें वद्य प्रतिपदेला लिहिलीं. वद्य प्रतिपदेस इंग्रजी १२ व १३ अशा दोन तारखा होत्या. शनवारीं सूर्योदयापासून मध्यरात्रीपर्यंत १२ वी तारीख होती व त्यापुढें १३ वी तारीख लागली. अर्थात् ५२ व्या लेखांकाची तारीख १२ मे १७३९ शनवार अशी आहे. व ५३ व्या लेखांकाची तारीख १३ मे १७३९ रविवार इंग्रजी अशी आहे. हें पत्र ह्या खंडांत अगोदर छापिलेलें होतेंच. रा. पारसनिसांच्या मोडी वाचनाच्याहि चुका ह्या पत्रांत बऱ्याच झाल्या आहेत. (१)

| | | | |
|---|---|---|---|
| | | | मोर्चेच लाविले ह्याबद्दल मोर्चे चालविले; (२) सोडून बद्दल पाडून; (३) कसकरलें बद्दल कचकरले; (४) आगीचा पुतळा बद्दल आगीचा पुला; वगैरे पाठ पाहिजे होते. |
| ५३ | १४ मे १७३९ | १३ मे १७३९ | |
| ६१ | १९ एप्रिल १७४२ | ९ एप्रिल १७४३ | |
| ६६ | | एप्रिल १७४४ | जनार्दनपंतांचें लग्न २० एप्रिल १७४४ स झालें. |
| ६७ | १४ एप्रिल १७४४ | १४ एप्रिल १७४४ | हें पत्र जनोबाच्या लग्नानंतर लिहिलें नाहीं; आधीं लिहिलें आहे. |
| ७१ | | १८ जुलै १७४४ | लेखांक ६७ व ६८ पहा. लेखांक ६७ च्यानंतर व ६८ च्या पूर्वी हें पत्र लिहिलें आहे. |
| ७२ | | २५ नोव्हेंबर १७४१ | |
| ७३ | | ८ मार्च १७४१ | |
| ७४ | | ३१ जुलै १७४१ | |
| ७६ | १२ सप्टेंबर १७३९ | १ सप्टेंबर १७४२ | लेखांक ६४ पहा. |
| ७७ | २६ मार्च १७४० | २३ मार्च १७४३ | लेखांक ८१ पहा. |
| ७९ | २४ १७४२ | १४ जून १७४२ | |
| ८२ | | २२ मार्च १७४३ | |
| ८३ | | १९ जानेवारी १७४३ | |
| ८४ | | २७ जानेवारी १७४३ | हीं तिन्हीं पत्रें बाळाजी बाजीराव हिंदुस्थानच्या स्वारीहून परत येण्याच्या अगोदर लिहिलीं आहेत. |
| १०० | | १७४२ | |
| १०१ | | जुलै १७३४ | |
| १०२ | | जुलै १७३४ | |
| १०८ | | १७४२ | |

| | | |
|---|---|---|
| ११२ | १७३२ | |
| ११४ | एप्रिल १७१७ | लेखांक १९ पहा. |
| ११५ ७ मार्च १७३५ | ४ एप्रिल १७३५ | २२ जिल्काद म्हणजे ५ एप्रिल. |
| १२० | जून १७३९ | |
| १२१ | १४ नोव्हेंबर १७३२ | १७३३ त निजामाला भेटण्याच्या पूर्वीचें पत्र. |
| १२३ | २४ आक्टोबर १७३९ | लेखांक १३९ पहा. |
| १२५ | १२ आक्टोबर १७३९ | लेखांक १३९ पहा. |
| १३० १३ जानेवारी १७३७ | ५ फेब्रुवारी १७३५ | लेखांक ११५ पहा. |
| १३७ १९ जुलै १७३९ | ७ जुलै १७४० | लेखांक ५६ पहा. |
| १३८ ९ सप्टेंबर १७३९ | २९ सप्टेंबर १७४० | हें पत्र बाजीरावाच्या मृत्यूनंतर लिहिलें आहे. |
| १४० १५ आक्टोबर १७३९ | ३ आक्टोबर १७४० | लेखांक १३७ पहा. |
| १४८ १५ डिसेंबर १७३८ | २५ डिसेंबर १७३८ | |
| १५२ | १४ फेब्रुवारी १७३९ | लेखांक १४५ पहा. |
| १६४ | ६ मे १७४२ | लेखांक २१४ पहा. |
| १६५ | ८ फेब्रुवारी १७४१ | हें पत्र चिमणाजीपंत वारल्यावर लिहिलें आहे. चिमणाजी कृष्ण भागवत केव्हां वारला ? रा. पारसनीस म्हणतात, तो १३ मे १७४१ रोजीं म्हणजे ज्येष्ठ वद्य ४ दुर्मतीनामसंवत्सरीं वारला. आतां ज्येष्ठ वद्य ४ ला त्या वर्षी १३ मे ही तारीख नसून २३ मे ही तारीख आहे. ज्येष्ठ वद्य ४ ही तिथी काव्येतिहाससंग्रहांतील ब्रह्मेंद्रस्वामीच्या बखरींतून पारसनिसांनीं घेतली आहे. त्या बखरींत खालील वाक्य आहे. “सन इहिदे अर्बैन ज्येष्ठ वद्य ४ छ १७ शके १६६३ |

दुर्मतिनामसंवत्सरीं जमादिलावलीं चिमणाजी कृष्ण यांस देवाज्ञा झाली. " ह्या वर्षी ज्येष्ठांत जमादिलावल महिना नसून रबिलावल महिना आहे व ज्येष्ठ वद्य ४ थीला छ १७ नसून छ १८ आहे. तेव्हां बखरींतील ही तारीख अगदीं अविश्वसनीय आहे. ही अविश्वसनीय तारीख खरी धरून रा० पारसनीस ह्या खंडांतील २२ व लेखांकाची मीं दिलेली तारिख खोटी ठरवूं पहातात. ह्या पत्राची २२ आगस्ट १७४० ही तारीख मीं दिली आहे. चिमणाजी कृष्ण १७४१ च्या १३ मेस वारला अशी खोटी समजूत करून घेऊन रा० पारसनीस २२ आगस्ट १७४० ही तारीख खोटी आहे असें प्रतिपादन करतात. ते म्हणतात, ह्या २२ व्या लेखांकांत जर चिमणाजी कृष्ण वारल्याची हकीकत आहे व चिमणाजी कृष्ण जर १७४१ त वारला, तर हें पत्र १७४० च्या आगष्टांतील कसें असूं शकेल? ह्यावर माझें असें म्हणणें आहे कीं, हा २२ वा लेखांक रा० पारसनीसांना स्वतंत्र मिळाला असून तो त्यांनीं नीट वाचला नाहीं. नीट वाचला असता

तर त्यांनीं अशीं भ्रामक विधानें केलीं नसतीं. ह्या बाविसाव्या लेखांकांत दोन विधानें केलीं आहेत. ( १ ) चिमणाजी कृष्ण वारल्याचें एक विधान, व ( २ ) चिमणाजी बल्लाळ पेशवे ह्यांस चिरंजीव म्हटल्याचें दुसरें विधान. तात्पर्य, हें पत्र लिहिलें त्या वेळीं चिमणाजी अप्पा पेशवे जिवंत होता व चिमणाजी कृष्ण वारला होता. आतां चिमणाजी बल्लाळ पेशवे १७४० च्या १७ डिसेंबरीं वारला हें प्रसिद्ध आहे. अर्थात् १७४० च्या १७ डिसेंबरच्या अगोदर व १७४० च्या २२ आगस्टाच्या अगोदर चिमणाजी कृष्ण भागवत वारला असला पाहिजे. तेव्हां रा० पारसनीस यांनीं स्वामीच्या पत्रव्यवहाराला जोडलेल्या बखरवजा चरित्राच्या १२३ व्या पृष्ठावर मीं दिलेली तारीख खोटी करण्याचा जो प्रयत्न केला आहे तो केवळ हास्यास्पद आहे. ह्यासंबंधानें ह्या तिसऱ्या खंडांतील लेखांक ८४रा० पारसानिसांनीं पहावा. त्यांत १७४० च्या ६ आगस्टास जगन्नाथपंताची नेमणूक बाळाजी बाजीरावानें ३०० रुपये केली आहे. अर्थात् चिमणाजीपंत ह्यावेळीं वारला

| | | |
|---|---|---|
| १६६ | १७४२ | होता. ह्या पत्राच्या टीपांत गप्पांचा भाग विशेष आहे. रा० पारसनीस हें पत्र १७३७ च्या अगोदरचें समजतात व भास्करराम १७३७ त मारला गेला म्हणून लिहितात; परंतु हें त्यांचें शुद्ध अज्ञान आहे. |
| १६७ | १७४२ | |
| १६८ | १७४२ | |
| १८२ | १५ सप्टेंबर १७३३ | रा० संभाजी आंग्रे ज्याअर्थी १७४२ च्या जानेवारींत वारला त्याअर्थी हें पत्र १७३३ तलि आहे. |
| १८३ | १६ फेब्रुवारी १७३१ | ह्या पत्रांत १७३१ तलि थोराताच्या दंग्याचा उल्लेख आहे. |
| १८४ | १७४५ | हें पत्र ताराबाईच्या हुकुमावरून दमाजी गायकवाडानें अद्वैतेंद्रास लिहिलें आहे; रा० पारसनीस लिहितात त्याप्रमाणें समाधिस्थ परमहंसास लिहिलें नाहीं. |
| १८५ | २४ फेब्रुवारी १७३२ | ह्याहि पत्राच्या टिपेंत गप्पा आहेत. |
| १८७ | १० आक्टोबर १७३७ | |
| १९० | १७३२ | अमदाबादेवरील स्वारी १७३४ त झाली नसून १७३२ त झाली. |
| १९४ | १७४२ | |
| १९५ २१ मे १७३९. | ११ मे १७३९ | |
| १९७ | | ह्या पत्राच्या टिपेंत ब्रह्मेंद्र फक्त ताक पिऊन रहात असे म्हणून पारसनीस लिहितात. परंतु स्वामीला चमचमीत |

| | | |
|---|---|---|
| | | भोजनाचे पदार्थ लागत ह्याचे दाखले आहेत. |
| २०१ | ३ एप्रिल १७२७ | हें पत्र मीं पूर्वी छापिलें आहे. |
| २०२ | १७३० | सेखोजी १७३६ त वारला नसून १७३३ त वारला. |
| २०३ | २५ जून १७३३ | |
| २०४ | डिसेंबर १७४४ | आपाजी हें संभाजीचें टोपण नांव नव्हे. आपाजी म्हणजे मानाजी आंग्रे. लेखांक २०५ पहा. लेखांक २०५ हें पत्र १७४४ त लिहिलें आहे, त्यावेळीं संभाजी मरून दोन वर्षें झालीं होतीं. |
| २१२ | १७३५ | शाहू महाराजांची रोजनिशी पहा. |
| २१४ | ६ मे १७४२ | वैशाख शु॥ १३=१२ रा॥ वल लेखांक १६४ पहा. |
| २१८ | ८ आक्टोबर १७३२ | |
| २२० | २९ आगस्ट १७३१ | |
| २३२ | १६ नोव्हेंबर १७४१ | लेखांक १५५ पहा. |
| २३३ | २९ एप्रिल १७४१ | |
| २३८ | १८ जानेवारी १७४४ | |
| २३९ | १९ जून १७४४ | 'अविनयभाव' याबद्दल 'अविनाभाव' पाहिजे. |
| २४० | २२ नोव्हेंबर १७३८ | |
| २४१ | २२ नोव्हेंबर १७३८ | हें पत्र रा. पारसनीस १७३३ च्या सुमाराचें समजतात. परंतु २१ जुलूस म्हणजे १७३८ हें साल येतें. १७३३ पासून पुढें स्वामी कोंकणांत समाधीस गेला नाहीं. तेव्हांपासून पांच वर्षें होत आलीं. ह्यावेळीं अबदुल रहमान याकुतखान हा तख्तावर होता. |

| | | |
|---|---|---|
| २४२ | १ सप्टेंबर १७४४ | २६ जुलूस म्हणजे इ० स० १७४४ रा. पारसनीस हें पत्र १७३८ तील समजतात. १२ वर्षें म्हणजे १७३३ पासून धरलीं पाहिजेत. हें पत्र व ३ ऱ्या खंडांतील १०४ लेखांक एकच आहेत. |
| २४३ | १५ जुलै १७४४ | लेखांक २४२ पहा. |
| २४५ | २० एप्रिल १७३६ | रा. पारसनीस ह्या पत्राचें साल १७३५ देतात तें अर्थात् चूक आहे. |
| २४७ | २६ आगस्ट १७३१ | |
| २४९ | १५ एप्रिल १७३२ | |
| २५० | २२ जून १७३२ | |
| २५१ | ३१ आगस्ट १७३१ | |
| २५२ | २५ मे १७३७ | |
| २५३ | ५ सप्टेंबर १७२७ | |
| २५५ | १७४० | |
| २५६ | १७४० | |
| २५७ | १७४० | |
| २६८ | १७३५ | |
| २६९ | १७३५ | |
| २७६ | १७३६ | |
| २७७ | १७३३ | |
| २७८ | जून १७३६ | |
| २८० | १७३३ | |
| २८१ | १७३६ | |
| २८३ | १७३६ | |
| २९१ | १७४१ | |
| ३०२ | १७३० | हें पत्र मालोजी पवारास लिहिलेलें आहे. |
| ३१० | १७३३ | लेखांक १८८ पहा. |
| ३११ | १७४० | |
| ३१४ | १७३६।३७ | |

| | | |
|---|---|---|
| ३२० | १७३६।३७ | |
| ३२१ | १७३१ | |
| ३२२ | १७४४ | ह्या पत्रावर रा.पारसनीस ह्यांस एक अर्धवट शिक्का उमटलेला सांपडला.त्यांत " लस्य मुद्रा जयति सर्वदा " अशीं अक्षरें होतीं. त्यावरून सदर इतिहासपटूनें असा तर्क केला कीं, हा स्वामीच्या शिक्याचा एक अपूर्ण भाग असावा! व पुढें अशी स्तुत्य जिज्ञासा दर्शविली कीं, हा शिक्का संपूर्ण सांपडल्यास इतिहासाचें मोठें हित होईल. ह्या जिज्ञासेपुढें मिस्तर पिक्विक् यांची मढ्याच्या थडग्यावरील अक्षरांत रोमन इतिहास जाणून घेण्याची जिज्ञासा केवळ फिक्की पडते!!! रा. पारसनीस यांनीं मीं छापिलेलीं कान्होजी आंग्रयांचीं पत्रें पाहिलीं असतीं म्हणजे रा.पारसनिस ह्यांच्या स्तुत्य जिज्ञासेचें थोडेंबहुत समाधान झालें असतें.<br>कान्होजीच्या पत्रांवर सही मुद्रा आहे:—<br>श्री शाहूनृपतिप्रीत्या तुकोजी तनुजन्मनः ।।<br>कान्होजी सरखेलस्य मुद्रा जयति सर्वदा ।।<br>ह्यांतील दुसऱ्या ओळीचा कांहीं उपयोग झाल्यास इतिहासपटूंनीं करून घ्यावा. |

| | | |
|---|---|---|
| ३३० | २३ जून १७३३ | |
| ३५२ | २८ एप्रिल १७३१ | |
| ३६५ | १७४० | |
| ३६७ | १७३१ | |
| ३६९ | | यमाजी बद्दल एसाजी पाहिजे. हें एसाजी आंग्र्यास पत्र आहे. |

---

## चरित्र.

| | | |
|---|---|---|
| १८ १७२६ | १४ आगस्ट १७२५ | राजशक ५२, विश्वावसु, भाद्रपद बहुल १३ गुरुवार. |
| १८ टीप | २७ सप्टंबर १७२५ | २९ मोहरम सु॥ सीत अशरीन. |
| २८ | २२ मार्च १७२८ | २१ साबान सु॥ समान अशरीन. |
| ४९ १७३३ | १० मे १७३२ | २५ जिल्काद. |

---